महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!
पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.
※ संपादक ※
मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. – २४८ ■ बुधवार दि. २३ एप्रिल २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

## विनापरवाना जनावरांची वाहतूक करणारा ट्रक पकडला

### सटाणा–मालेगाव रस्त्यावर गोरक्षकांची कामगिरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**सटाणा प्रतिनिधी :–** सटाणा–मालेगाव रस्त्यावर विनापरवाना जनावरांची वाहतूक करणारा ट्रक गोरक्षकांनी पकडला असून सदरचा ट्रक सटाणा पोलीस स्टेशन येथे आणून कारवाई करण्यात आली आहे.

सटाणा– मालेगाव रस्त्यावर जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली. त्यानुसार लक्ष ठेवून असलेल्या गोरक्षकांनी शेमळी गावाजवळ जिजे १६ एव्ही ८३७१ क्रमांकाचा ट्रक थाबवत चौकशी करत तपासणी केली असता ह्या ट्रक मध्ये निर्दयीपणे १६ म्हशी कोबून भरलेल्या आढळल्या.





जनावरांची वाहतूक करण्याचा कोणताही परवाना ट्रक चालकाकडे नसल्याने सदरचा ट्रक सटाणा पोलीस स्टेशन येथे आणत पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला. ट्रक मध्ये निर्दयीपणे कोबून भरलेल्या म्हशी पोलीस ठाण्याच्या मैदानावर ट्रक मधून खाली उतरवण्यात आल्या असून ट्रक मध्ये एक म्हैस मृत अवस्थेत आढळली आहे. इतर म्हशीना देखील जखमा झाल्या आहेत.

म्हशीना झालेल्या जखमांच्या वेदना होत असल्याने त्यांच्या डोळ्यातुन अश्रू येत होते. त्याच्यावर पशुवैध्यकीय अधिकारी डॉ पवार यांनी उपचार केले आहेत. अशा निर्दयीपणे जणांवरांची वा–हतूक करणाऱ्यावर कडक कारवाई झाली पाहिजे अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## पश्चिम बंगालमधील बिघडलेली राष्ट्रीय सुरक्षा आणि हिंदूंवरील अत्याचार

### विश्व हिंदू परिषद – बजरंग दल, नांदगाव प्रखंड यांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव – निवेदनातील प्रमुख मुद्दे:
१. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सरकार केवळ मतपेटी वाढविण्यासाठी आणि सत्तेच्या हव्यासासाठी देशाच्या संघराज्य रचनेलाही धोका पोहोचवत आहे. २. संपूर्ण राज्यात राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.
३. हिंदू समाजावर सातत्याने हिंसाचार घडत आहे, त्यावर कोणतीही कठोर कारवाई होत नाही.
आमच्या प्रमुख मागण्या:
पश्चिम बंगालमध्ये त्वरित राष्ट्रपती राजवट लागू करण्यात यावी.
राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याचे सर्वाधिकार केंद्रीय सुरक्षा दलांकडे सोपविण्यात यावेत.
बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांची ओळख करून त्यांना देशाबाहेर हाकलले जावे.पश्चिम बंगाल आणि बांगलादेश दरम्यानची ४५० कि.मी. सीमा तारा fencing ने सुरक्षित करण्याचे काम तातडीने सुरू करावे, जे ममता बॅनर्जी सरकारने थांबवले होते.

## बागलाणच्या ८२ ग्रामपंचायत आरक्षण सोडत : ४३ गावांतील सरपंचद खुल्या प्रवर्गासाठी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी :–**

बागलाण तालुक्यातील ५ मार्च २५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणार्या ८२ ग्रामपंचायती करीता सुधारीत अनुसूचति जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण वर्गकरीता ग्रामपंचायतनिहाय सरपंच पदाचे आरक्षण पंचायत समितीच्या सभागृहात बागल–णचे तहसीलदार कैलास चावडे यांचे अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढण्यात आली . पंचायत समितीच्या सभागृहात दुपारी १२ वाजता ८२ ग्रामपंचायतकरीता सरपंचपदासाठी आरक्षण बालक समर्थ जितेंद्र मोरे याचे हस्ते चार प्रवर्गातील आरक्षण सोडत काढण्यात आली.

आरक्षण व गावे – अनुसूचित जाती नांदीन, वायगांव, आराई, निताणे, मळगांव ति., वाघळे

अनुसूचित जमाती पिंगळवाडे, अजमेरसौंदाणे, मोरोण सांडस, चौधाणे, जुनी शेमळी, भाक्षी, नळकस, ढोलबारे, खिरमाणी, औंदाणेपाडा व रामतीर ना.मा. प्रवर्ग कन्हे, काकडगांव, खामलोण, नवेगांव, धांद्री, दरेगांव, नामपूर, जायखेडा, तळवडे भा., औदाणे, मुळाणे, ब्राम्हणगांव, सारदे, सोमपूर, पिंपळदर, बोढरी, इजमाणे, मळगावं भा., मोरेनगर, टेंभे खालचे, डोंगरेज, ताहाराबाद

सर्वसाधारण जूने निरपूर, यशवंत नगर, सुराणे, नवेनिरपूर, फोफीर, बिजोरसे, ब्राम्हणपाडे, भडाणे, पार–नेर, रातीर, उत्राणे, लाडूद, ठेंगोडा, लखमापूर, बिजोटे, खमताणे, कोटबेल, दोधेश्वर/कोळीपाडा, दर्हाणे, देवळाणे, आखतवाडे, वाडीपिसोळ, नवीशेमळी, तरसाळी, द्याने, अंबासन, श्रीपूरवडे, करंजाड, मुंजवाड, चौगाव, पिंपळकोठे, तांदुळवाडी, आनंदपूर, महड, आसखेडा, टेंभेवरचे, गोराणे, आव्हाटी, विरगाव, वनोली, वटार, चिराई व कुपखेडा आदी गावांचा सर्वसाधारण गटात समावेश आहे. महिला आरक्षण सोडत गुरूवार दि.२४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी श्रीमती कल्पना ठुबे यांचे अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात काढण्यात येणार आहे.

## अवैध गॅस रिफिलींग सेंटरवर चाळीसगाव पोलिसांचा छापा, ३६ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**यशवंतराव ताडगे चाळीसगाव /प्रतिनिधी:–** चाळीसगाव तालुक्यातील वाघळी येथील अवैध गॅस रिफ्लिंग सेंटर चाळीसगाव पोलिसांचा छापा . ३६हजार किंमतीचा मुद्दे मा जप्त करण्यात आला आहे.




सविस्तर माहिती अशी की चाळीसगाव तालुक्यातील वाघळी येथे अवैध गॅस साठा करून वाहनांमध्ये अवैध पद्धतीने गॅस रिपलिंग सेंटर चालवले जात होते.. वाघळी येथील यशवंत पब्लिक स्कूल जवळ हमीद शहा याने घरगुती वापराचे गॅस सिलेंडर जमा करून चार चाकी वाहनांमध्ये गॅस रिप–लिंग अवैध सेंटर, राजरोसपणे चालवत होता. मंगळवार दिनांक २२एप्रिल रोजी ठीक ४वाजेच्या सुमारास चाळीसगाव पोलिसांनी अवैध गॅस रिपलिंग दुकानावर छापा टाकून सुमारे ३६ हजार किंमतीचा मुद्दे माल जप्त केला. यात ९घरगुती गॅस सिलेंडर, वाहनांमध्ये गॅस भरण्याचे मशीन इतर साहित्य जप्त केले. हमीद शहा याच्यावर भादवी कलम १२४/२५ गुन्हा रजिस्टर नुसार इ सी३, ७भा . न्या.संहिता नुसार २८७,२८८ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चाळीसगाव पोलीस यांनी गुन्हा दाखल केला आहे.

स्टेशनचे ग्रामीण पोलीस निरीक्षक राहुलकुमार, पवार, तालुका पुरवठा निरीक्षक जोस्ना हनुमंते पोलीस हवालदार गोवर्धन बोरसे, ओंकार सुतार, प्रदीप पवार, वाघळी पोलीस पाटील जयश्री बरहाटे, पंच विकास बरहाटे, विकास चौधरी उपस्थित होते.

## सहा महिन्यांपासून रस्ता खोदून ठेवल्याने नांदगाव शहरातील नागरीक त्रस्त

**थेट जनतेच्या मनातील...**

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव शहरात प्रभाग क्रमांक १ वॉर्ड क्रमांक २ या ठिकाणी गेल्या सहा महिन्यापासून रस्ता खोदून उकरून ठेवला आहे त्या ठिकाणी रस्ता कंक्रिटी करण भूमिगत गटार है नवीन काम मंजूर असून गेल्या सहा महिन्यात पा–सून हे काम प्रलंबित आहे. फक्त रस्ता उकरून ठेवला आहे त्या मुळे पिण्याची पाण्याची सुद्धा लाइन फुटलेली आहे.आणि सदर कामाच्या वेळोवेळी तोडी लेखी तक्रारी करून सुद्धा त्या वर काहीच कार्यवाही नाही. सदर काम पूर्ण नसाल्यामुळे सर्व रहिवाश्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे त्या अपूर्ण कामा मुळे सदर ठिकाणी मानवी अपघात सुद्धा झाले आहेत.



ठेकदार फोन उचलत नाही. आता पर्यंत कामावर सुद्धा आलेला नाही.

हे अपूर्ण काम असल्यामुळे वाहतुक दवाखाना तसंच ज्येष्ठ नागरिक गर्भवती महिला यांना खूप मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. ही तक्रार करत असतांना योग्य ती कार्यवाही होईल तसेच उच्चतम दर्जाचे शासकीय नियमान नुसार काम पूर्ण होईल अशी आशा बाळगतो.

**– विकास शर्मा, ता.नांदगांव जि.नाशिक**

**= भावपूर्ण श्रद्धांजली =**

**दहशतवादाचा झाला भ्याड हल्ला**
**माणुसकीला फासली काळिमा**
**सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होतो पुन्हा**
**जम्मू–काश्मीरच्या पर्यटकांचा काय**
**घडला गुन्हा ?**
**डसला त्यांना दहशतवादाचा विषारी**
**फणा**
**सुन्न झाल्या भावना.. संपल्या संवेदना**
**प्रत्येक भारतीयांच्या डोळ्यात अश्रू**
**येतात**
**= भावपूर्ण श्रद्धांजली =**

**कवी – शांताराम वाघ.मनमाड**
**मो.८०८७४९३४५३.**

# पर्यावरण संरक्षण आणि जागरूकता वाढवण्यासाठी साजरा होतो पृथ्वी दिवस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पृथ्वीचा दिवसेंदिवस ह्रास होत आहे आणि यामुळे ऑक्सिजनची मात्रा सुध्दा कमी होत आहे ही घटना कोरोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पाहिली. यामुळे जगात लाखोच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली. याकरीता पृथ्वीला वाचवण्यासाठी सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे. आज बदलत्या हवामानामुळे दिनांक २० एप्रिल २०२५ ला देशात नागपूरची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली. कारण नागपूरचा पारा ४४.७ अंश डिग्री सेल्सियस ने संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला.

पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून जागतिक पृथ्वी दिवस साजरा करण्यात येतो. प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले.भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दिसुन येतात. यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण, वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, महाप्रलय, महामारी, साथीचे रोग,अती पाउस, अती उष्णता, अती थंडी,वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे.ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार, अणुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत. आतातर बायोवेपन्स म्हणजे जैविक हत्यार बनविण्याची शर्यत लागली आहे आणि याही पुढे जाऊन पुढील युद्ध द्रोणच्या सहाय्याने लढले जात आहे. यामुळे पृथ्वी तहस-नहस होवू शकते.आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते. सध्याच्या परीस्थितीत चिन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे. चिन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हतीयाराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो. २०१९ मध्ये चिनने कोरोना व्हायरसचे परीक्षण करून मानवजातीसोबत खुनी तांडव केल्याचे दिसून आले.आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चिन पृथ्वीचा सर्वनाश करतांना दिसतो. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले, तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दिसतात.यामुळे दिवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते.त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे. पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे. यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात.त्यातुनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस म्हणुन साजरा केला जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे. त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पहाला आहे.परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे, ज्यांच्या परीसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडलीमध्ये तरी झाड



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

लावुन पृथ्वी दिवस साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला हवे.कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते.जगातील गिधाड हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो. मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे गिधाडांचे काम असते. त्यामुळे अशुद्ध परीसर शुद्ध होतो. परंतु दुःखाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दिसते. त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील. मानवजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी पृथ्वीची राखरांगोळी केली आहे. पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील. आता इजरायल-हमास-इराण संघर्ष, अमेरिका-इराण संघर्ष व रशिया-युक्रेन संघर्ष यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते. आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्रिचम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिण पर्यंत, आकाश-पाताळा या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज पृथ्वी माता सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की. याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल.यामुळे विहीरी, तलाव व नदी-नाले, ओढे नेहमी जलमग्न राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत. मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे. परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही. कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे. परंतु मानवाला अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल व अपंग होतांना दिसतो. वनवा लागले, महाप्रलय येणे, हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने, भुकंप येणे, सुनामी येणे, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.पृथ्वीला वाचविने म्हणजे महायुध्द जिंकण्यासारखेच आहे हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातुन प्रयत्न व्हावयास पाहिजे. आज संपूर्ण जग कठीण घडीतुन प्रवेश करीत आहे. संपुर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहे एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारी पासुन सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासुन जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी मानुसकी दाखवेल. कारण दीवसेंदीवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढुन पृथ्वीवरील जमिनीचा भुभाग कमी-कमी होतांना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबवीला पाहीजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे.यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअर्थाने पृथ्वी दीवसमानल्या जाईल. पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. कारण युक्रेन युद्ध पहाता अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरिया, जापान, इराण, इराक, इजरायल, ब्रिटन एकमेकांच्या विरोधात अनुबॉम्बच्या किंवा अत्याधुनिक मिसाईलच्या धमक्या देतांना दिसतात. यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे.

पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगल तोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल.पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मुलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.

# साई बाबांची शिकवण सामान्य माणसांच्या जीवनाला असामान्य रीतीने स्पर्शून जाते : विनीत रैना

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन आपल्या ‘शिरडी वाले साईं बाबा’ या आगामी मालिकेच्या माध्यमातून पुन्हा एकदा टेलिव्हिजनवर श्रद्धा आणि भक्तीची किमया घेऊन येत आहे. ही नवी मालिका आशा आणि करुणेत भिजलेल्या साई कथा आणि साई बाबांची शिकवण प्रेक्षकांपर्यंत घेऊन येईल. अभिनेता विनीत रैना या मालिकेत साईंची भूमिका करत आहे. ही भूमिका हा त्याच्या स्वतःच्या करकिर्दीतील मोठा बदल घडवणारा अध्याय आहे. या खास गप्पा गोष्टींमध्ये विनीत साई बाबांची भूमिका करण्याचा अनुभव, त्यातील जबाबदारी आणि एक व्यक्ती आणि अभिनेता म्हणून या भूमिकेचे महत्त्व याविषयी सांगत आहे.

या मुलाखतीचे अंश:

साई बाबांसारखी अत्यंत आध्यात्मिक आणि पूजनीय व्यक्तिरेखा साकारताना कसे वाटते आहे?



खरं सांगायचं तर ही काही केवळ एक भूमिका नाही. हा एक दिव्य आशीर्वाद आहे. साईंची शिकवण मला नेहमीच प्रेरित करत आली आहे. पण प्रत्यक्ष साईंची भूमिका साकारण्याची संधी मिळणे हे माझे अहोभाग्य आहे. मला तर वाटते की या भूमिकेने मला शोधले आहे, मी या भूमिकेची निवड केलेली नाही. या सेटवरील प्रत्येक दिवस एक आध्यात्मिक अनुभव असतो.

भावनिक आणि आध्यात्मिक सखोलता असलेली ही भूमिका स्वीकारताना मनात काही संदेह होता का?

लोक ज्यांना पूजतात, त्यांची भूमिका करताना एक जबाबदारी तुमच्या खांद्यावर असते. ही भूमिका करताना केवळ त्या व्यक्तिरेखेचे दिसणे, देहबोली, हावभाव ठीकठाक असणे पुरेसे नसते. तर या व्यक्तिमत्त्वातील शांतपणा, समजूतदारपणा, प्रेमळपणा देखील अभिव्यक्त होणे गरजेचे असते. त्यासाठी समर्पण लागते, परफॉर्मन्स नाही.

इतर आध्यात्मिक मालिकांपेक्षा ‘शिरडी वाले साईं बाबा’ ही मालिका कशी वेगळी आहे?- ही मालिका चमत्काराच्या पलीकडे जाते. यामध्ये श्रद्धा, करुणा आणि परिवर्तनाच्या दैनंदिन कथांवर लक्ष केंद्रित केलेले आहे. यामध्ये हे दाखवण्यात आले आहे की सामान्य लोकांच्या जीवनाला साई बाबांची शिकवण कशी असामान्य रीतीने स्पर्श करून जाते. यात व्यक्त होणाऱ्या भाव-भावनांशी प्रेक्षक सहज निगडीत होऊ शकतात.

‘शिरडी वाले साईं बाबा’ मालिकेतून प्रेक्षकांना कोणता संदेश मिळेल?

जगाला आणखी करुणा आणि श्रद्धा यांची गरज आहे. मला आशा आहे की, या मालिकेतून प्रेक्षकांना करुणा आणि निःस्वार्थ सेवा या मूल्यांची महती समजेल.

शूटिंग दरम्यान असा एखादा क्षण होता का, जेव्हा या भूमिकेतील दिव्यत्व तुला अनुभवास आले?

अनेकदा! सेटवर अनेकदा असे क्षण आले, खास करून भक्तांशी संवाद करताना, त्यांना आशीर्वाद देताना. अशा वेळी मला ती अथांग शांतता जाणवते, जणू साई बाबांची ऊर्जा मला मार्गदर्शन देत आहे, असे वाटते. हे शब्दांत सांगणे कठीण आहे, पण हे क्षण मला हेलावून सोडतात.

तुझ्या मते आजचे प्रेक्षक, विशेषतः तरुण पिढी या मालिकेशी कशी कनेक्ट होईल?

मला वाटते, तरुण पिढी तर शांतता आणि अर्थपूर्णता यांचा शोध घेत आहे. या मालिकेत त्यांना हे सापडेल. या मालिकेत दया, श्रद्धा आणि प्रेम या भावनांचा पुरस्कार केला आहे, ज्या कालातीत भावना आहेत आणि सगळ्यांनाच त्या लागू होतात आणि आपल्याशा वाटतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

## तापमान वाढीमुळे कोल्हापूर शहरांमधील सर्व सिग्नल १२ ते सायं ४ या वेळेत बंद करा - युवक कृती समितीची मागणी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नामदेव गुरव/आनूर** – महाराष्ट्रामध्ये उष्णतेची लाट दिवसेंदिवस वाढत आहे आणि अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सियसपेक्षा जास्त नोंदवले जात आहे. विशेषत: मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तापमानाने उच्चांक गाठला असून उन्हाचे प्रमाण वाढले आहे.

कोल्हापूरमध्ये देखील उन्हाचा चटका अधिक जाणवत असल्याने घराबाहेर पडणे अशक्य होत आहे. बऱ्याच जिल्ह्यामध्ये उष्माबळी प्रकार देखील समोर येत आहेत कोल्हापूर शहरामध्ये देखील उन्हाचे तापमान हवामान खात्याच्या अंदाजे नुसार ४०ओ ते ४२ओअंश सेल्सिअस इतके जात आहे कोल्हापूर शहरातील प्रमुख मार्गांवर दोन मिनिटाचे थांबा सिग्नल आहेत.

कोल्हापूर शहरांमध्ये वृद्ध ,विद्यार्थी –विद्यार्थिनी, तरुण महिला – पुरुष प्रवास करत असतात उन्हाचा पारा वाढल्याने नागरिकांना प्रवास करताना प्रचंड त्रास होत आहे. भविष्यात उष्माघाताचा प्रकार होण्याचे नाकारता येत नाही त्यामुळे कोल्हापूर मधील सर्व सिग्नल १२ ते ४ या वेळेत बंद करावे या मागणीचे निवेदन कोल्हापूर युवक कृती समितीच्या वतीने शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नंदकुमार मोरे यांना देण्यात आले. यावेळी निलेश सुतार, मयूर पाटील, विश्वविक्रम कांबळे, संजय पटकरे,सागर घोलप, रोहन वाघमारे, सचिन पाटील ,रंगराव पाटील ,गौरव कांबळे उपस्थित होते.

# भडगाव रोडवरील हॉटेलला लागलेल्या आगीतून कर्मचाऱ्यांना वाचविले

## चाळीसगाव नगरपालिकेच्या अग्निशमन दलाची कामगिरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**यशवंतराव ताडगे चाळीसगाव/ प्रतिनिधी** :– शॉर्ट सर्किटमुळे चाळीसगाव शहरातील भडगाव रस्त्यावरील एक हॉटेलला आग लागली. हॉटेलमधील जनरेटरच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.आगीने रौद्र रुप धारण केले होते. ही आग आणखीच भडकली. याची माहिती मिळताच चाळीसगाव शहर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले . त्यांनी मदत कार्य सुरू केले. हॉटेल भक्षस्थानी पडली. हॉटेलमध्ये अडकलेले ६ ते ७ जणांना सुरक्षितपणे आगीतून बाहेर काढून त्यांच्या प्राणांची रक्षा केली. हा थरारक प्रकार काल मंगळवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडला.

घटनेची माहिती अशी आहे की, भडगाव रोडवरील हॉटेल मनसुख येथे काल मंगळवारी आग लागली. हॉटेलमधील आग पसरल्याने जनरेटरमधील कॉम्प्रेसरचा स्फोट झाला आणि परिस्थिती अधिक गंभीर झाली. आगीची माहिती मिळाल्यानंतर पालिकेच्या अग्निशमन दलाने तात्काळ आग विझवली.



चाळीसगाव शहर पोलीसांनी घटनास्थळी पोहोचल्यावर पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर, हवालदार अजय पाटील, नितीन वाल्हे, संदीप पाटील, पो.शि. दीपक चौधरी, ज्ञानेश्वर पाटोळे, समाधान पाटील, विलास पवार, प्रविण पवार आणि राहुल नारेकर यांनी धाडसाने आगीच्या ज्वाळात घुसून हॉटेलमधील ६ ते ७ कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढले .आणि त्यांचे प्राण वाचवले. यात पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर यांना किरकोळ दुखापत झाली, त्यांच्यावर उपचारार्थ चाळीसगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.त्यांच्यावर उपचार केले .त्यांची त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे.

या आगीत मयूर लक्ष्मण कुमावत वय वर्षे ३२हा जखमी झाला, त्याच्या उजव्या हात आणि पायाला भाजले. त्याला उपचारांसाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याच आगीत एका गायीचे वासरू देखील जखमी झाले, अशी माहिती पोलीसांनी दिली.सुरेश पोपट महाजन वय ४६वर्ष हा देखील पाठीला आणि पायाला भाजल्यामुळे देवरे हॉस्पिटलमध्ये दाखल झालेले आहे शहर पोलीस निरीक्षक किरण कबाडी, पीएसआय गणेश सायकर पोलीस हवालदार अजय पाटील, नितीन वाल्हे, संदीप पाटील, पोलीस शिपाई दीपक चौधरी, ज्ञानेश्वर पाटोळे, समाधान पाटील, विलास पवार, प्रवीण पवार, राहुल नारेकर आदींनी आग विझवन्याच्या ठिकाणी उपस्थित होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्ती चे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली विझविण्यात यश मिळाविले.

आगीचे नेमके कारण शॉर्ट सर्किट असल्याचे सांगण्यात येत आहे, परंतु तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर माहिती सुरक्षित ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिली. चाळीसगाव शहरातील आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, ज्यात घाटरोड परिसरात दोन ते तीन आग लागलेल्या घटना आणि नागद रस्त्यावरील मिरची बाजारातील आग समाविष्ट आहे. तापमानाच्या वाढीमुळे आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, आणि त्यात मोठ्या प्रमाणात हानी देखील झाली आहे.

# गिरमेवस्ती शाळेतील 'बालांकुर' पुस्तकाचे प्रसिद्ध गायिका गौरी पगारे यांचे हस्ते दिमाखदार प्रकाशन: चिमुकल्यांच्या साहित्यिक प्रतिभेला केले गौरवान्वित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**जेऊर कुंभारी प्रतिनिधी** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गिरमेवस्ती ( जेऊर कुंभारी ) येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'बालांकुर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा गुरुवार दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी मारुती मंदिर सभागृहात मोठ्या उत्साहात झी मराठी सारेगमप लिटिल चॅम्प्सच्या विजेत्या प्रसिद्ध गायिका कु. गौरी पगारे आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन इयत्ता पाचवीच्या कु. शुभांगी गायकवाड, कु. त्रिशा मोहन आणि कु. श्रावणी चव्हाण या विद्यार्थिनींनी केले.

कार्यक्रमाची रूपरेषा आणि प्रास्ताविक पाध्यापक व 'बालांकुर'चे संपादक सुदाम साळुंके यांनी केले. त्यांनी शाळेत राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. –ी र ढशरलहशी या उपक्रमांची दखल खुद्द शिक्षण विभागाने घेतली आहे. जि. प. अहिल्यानगरच्या 'मिशन आरंभ' उपक्रमांतर्गत चौथीपासून नवोदय, शिष्यवृत्ती आणि विविध स्पर्धा परीक्षांची तयारी, ऑनलाईन व जादा तासिका, सराव परीक्षा, विविध गुणदर्शन आणि विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थ्यांच्या यशोगाथांचा उल्लेख केला. बालांकुर पुस्तक निर्मितीसाठी गटशिक्षणाधिकारी मा. श्रीमती शबाना शेख आणि गटविकास अधिकारी मा. श्री. संदीप दळवी साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हनुमंतराव भोंगळे (माजी आयुक्त, विश्वस्त, जंगली महाराज आश्रम ) यांनी भूषविले. शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ, शाल आणि 'बालांकुर' पुस्तक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.



यानंतर प्रकाशन कार्यक्रम, प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध गायिका कु. गौरी अलका पगारे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते मुलांनी मुलांसाठी तयार केलेल्या पहिल्या 'बालांकुर' पुस्तकाचे प्रकाशन झाले. टाळ्यांच्या गजरात आणि उत्साही वातावरणात पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना 'बालांकुर' पुस्तक व शाळेचे स्मृतिचिन्ह देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर आत्मविश्वास होता. शिक्षकांच्या डोळ्यातही समाधानाची चमक होती. आपले कार्य फळाला आले, हे पाहून हा कार्यक्रम केवळ एक दिवसाचा नव्हता, तर तो एक परिवर्तनाचा आरंभ होता. शिक्षण, संस्कार आणि संस्कृती यांचा संगम होता आणि तो घडविला गिरमेवस्तीच्या प्रेरणादायी शिक्षकांनी, पालकांनी आणि लहानग्या 'बालांकुर' प्रतिभांनी !

मा. शबाना शेख (गटशिक्षणाधिकारी, पं.स. कोपरगाव) यांनी ऑनलाईन माध्यमातून आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, मुलांनी मुलांसाठी 'बालांकुर'सारखे पुस्तक तयार करणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. त्यांनी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. शिक्षकांच्या प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्या कु. गौरी अलका पगारे (झी मराठी लिटल चॅम्पस विजेत्या) यांनी आपल्या मधुर वाणीने आणि 'मित्र वनव्यातला गारव्यासारखा' यांसारख्या लोकप्रिय गीतांनी कार्यक्रमात रंगत भरली. त्यांनी मुलांना शुभेच्छा देताना सांगितले की, मोठे होण्यासाठी केवळ पैशाची गरज नसते, तर जिद्द, मेहनत आणि चिकाटीची आवश्यकता असते. त्यांनी मुलांशी व पालकांशी संवाद साधला आणि त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

हनुमंतराव भोंगळे (अध्यक्ष विश्वस्त जंगली महाराज आश्रम ) अध्यक्षीय भाषणात गिरमेवस्ती शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे आणि विविध उपक्रमांचे कौतुक केले. मुलांनी मुलांसाठी पहिले 'बालांकुर' पुस्तक तयार करण्याचा विक्रम गिरमेवस्ती शाळेने केला आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यासाठी सुदाम साळुंके सरांनी घेतलेल्या अथक परिश्रमांचे त्यांनी कौतुक केले. पुस्तकातील गोष्टी बोधपर असून त्यातील प्रतिज्ञा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यायोग्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मा. शिवाजीराव वक्ते (माजी सभापती) यांनी गिरमेवस्ती शाळेतील शिक्षणाची गुणवत्ता आणि शाळेतील उपक्रमांचे कौतुक करताना शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीची विशेष प्रशंसा केली.

भीमराज वक्ते (दि न्यू इंडिया इन्शुरन्स) यांनी गिरमेवस्ती शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले आणि सांगितले की, इतर शाळांनी या शाळेचा आदर्श घ्यावा. इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा मराठी माध्यमाच्या शाळेतील शिक्षण अधिक दर्जेदार असते, हे गिरमेवस्ती शाळेने दाखवून दिले आहे. शाळेतील तिन्ही शिक्षकांनी आजपर्यंत अनेक नवनवीन उपक्रम राबवून शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.

शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ. सुवर्णा चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, त्यांनी स्वतःच्या मुलीला इंग्रजी माध्यम सोडून गिरमेवस्तीच्या मराठी शाळेत प्रवेश दिला. या निर्णयामागे साळुंके सरांनी घेतलेली मेहनत, अभ्यासपुस्तके तयार करून दिलेली मदत, व 'As a Teacher' नावीन्यपूर्ण उपक्रमांचा परिणाम होता. त्यांनी नमूद केले की त्यांच्या मुलीसह इतर सर्व मुलांचे मोठे शैक्षणिक परिवर्तन घडून आले आहे.

संचालक बाळासाहेब वक्ते केंद्र प्रमुख, चांदेकसारे रावसाहेब लांडे), संजय दुशिंग (ग्रामसेवक, जेऊर कुंभारी), संजय दहिफळे विषय तज्ञ पं.स.कोपरगाव, ग्राम पंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ग्रामस्य ,मिथून चव्हाण– साई धाम शिर्डी, पाटीलबा शहाजी वक्ते व ग्रामस्थ, पालक यांच्यासह अनेक मान्यवरांनी शाळेतील उपक्रम, शिक्षकांचे समर्पण आणि विद्यार्थ्यांचे यश याचे कौतुक केले.

या प्रसंगी इयत्ता पाचवीच्या कु. शुभांगी गायकवाड, कु. त्रिशा मोहन आणि कु. श्रावणी चव्हाण, साई वक्ते व सहजानंद वक्ते या विद्यार्थ्यांनी प्रभावी आत्मविश्वासपूर्वक मनोगत व्यक्त केले.

शिक्षक मनोगत व्यक्त करताना अनुज ढुमणे सर यांनी शाळेतील सर्व उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी केले होते. निमंत्रण, सजावट, पाहुण्यांचे स्वागत, अशा सर्व जबाबदाऱ्या त्यांनी खूप चोखपणे पार पाडल्या. हा कार्यक्रम म्हणजे शिक्षणाचा उत्सव होता. विद्यार्थ्यांच्या कलेला वाव, शिक्षकांच्या प्रयत्नांची दखल, पालकांचा सहभाग आणि संपूर्ण ग्रामसमुदायाचा सहभाग या घटकांनी हा कार्यक्रम यशस्वी ठरविला. गिरमेवस्ती शाळेने हा 'बालांकुर' उपक्रम राबवून ग्रामीण भागातील शाळाही दर्जेदार शिक्षणाची केंद्रे होऊ शकतात हे सिद्ध केले.

हा उपक्रम इतर शाळांसाठी आदर्श ठरणार आहे, यात शंका नाही. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे तर जीवनकौशल्ये, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, आत्मविश्वास आदी अंगी बाणवतात. 'बालांकुर' हे पुस्तक म्हणजे त्या सर्व गुणांचे मूर्त स्वरूप आहे. मुख्याध्यापिका श्रीमती प्रियंका जोशी यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे, पालकांचे,

# रितीकेश मल्हारी इंगोले ते डॉ. रितीकेश मल्हारी इंगोले या प्रेरणादायी प्रवासाची कहाणी ...

## रितीकेश ची प्रचंड मेहनत, निरंतर अभ्यास, समर्पण आणि कुटुंबाच्या आशीर्वादाने घडलेली एक आदर्शवत यशोगाथा...


**दै. आवाज वृत्तसेवा...**

माणसाचे भविष्य त्याच्या स्वप्नांवर नव्हे तर त्या स्वप्नांच्या मागे धावण्याच्या जिद्दीवर अवलंबून असते. माणगांव सारख्या छोट्याशा गावातून आलेल्या एका बुद्धिमान आणि कष्टाळू तरुणाने ही गोष्ट खरी करून दाखवली आहे. ही यशोगाथा आहे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायम आ-पले प्रेरणास्थान मानणार्या रितीकेश मल्हारी इंगोले यांच्या शालेय शिक्षण, माध्यमिक शिक्षण ते वैद्यकीय महाविद्यालयीन शिक्षण ते डॉक्टर इथपर्यंत च्या संघर्षमय जीवनाची... रितीकेश मल्हारी इंगोले यांच्या वडिलांचे अर्थात डॉ. मल्हारी मुकिंदा इंगोले यांचे मूळ गाव नांदेड जिल्ह्याच्या अतिदुर्गम भागात असलेल्या हादगाव तालुक्यातील भाटेगाव हे असून ते नोकरी निमित्त १९९७ पासून रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात स्थित आहेत. त्यांनी केंद्रीय दवाखाना दहा खाटांचे दत्त नगर माणगाव येथे रुग्णांना सन २००२ ते २००५ अशी सलग तीन वर्षे मोफत वैद्यकीय सेवा दिली. त्या नंतर त्यांनी २००५ ते २००८ अतिदुर्गम भागात मानसेवी वैद्यकीय अधिकारी तालुका कर्जत येथे सेवा दिली. त्या नंतर त्यांनी २००८ ते २००१९ पर्यंत उपजिल्हा रुग्णालय माणगाव च् ज म्हणून सेवा दिली. रितीकेश च्या आईचे नाव सौ. श्रद्धा मल्हारी इंगोले रितीकेश ने आपल्या आईवडिलांच्या अपार कष्टांची जाणीव ठेवून आपल्या वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी डॉक्टर होऊन गोरगरीब सर्व सामान्य जनतेला सेवा देण्याचा मार्ग निवडला आणि त्याने अहर्निशपणे अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले. रितीकेश आपल्या बाल वयापासूनच अभ्यासात व सर्व क्षेत्रांमध्ये अव्वल ठरणारा हा युवक आज डॉक्टर होऊन समाजसेवेच्या व्रताला सज्ज आहे.

शालेय शिक्षणाची सुरुवात श्रेया पब्लिक स्कूल, माणगांव येथून झाली. पहिली ते सहावीपर्यंत प्रत्येक वर्षी शिक्षणात प्रथम येण्याचा मान त्याने पटकावला. केवळ अभ्यासच नव्हे, तर शालेय क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व, हस्तकला इत्यादी उपक्रमांमध्ये ही तो नेहमीच अग्रेसर राहिला.


वयाच्या केवळ अकराव्या वर्षी त्याने घरापासून दूर जाऊन जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घेतला हा निर्णय त्याच्यासाठी एक मोठा टप्पा होता. नव्या वातावरणात, जिल्हा स्तरीय स्पर्धेत सहभागी होणे, नवनवीन स्पर्धा, विविध विद्यार्थ्यांशी स्पर्धा आणि सुसंवाद साधणे यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ झाले. शाळेत असताना 'स्कूल कॅप्टन' म्हणून निवड होणे ही केवळ एक पदवी नव्हे, तर त्याच्या नेतृत्व गुणांची आणि जबाबदारीच्या जाणिवेची सुरुवात होती. २०१५-१६ मध्ये दिल्ली येथे झालेल्या १९ व्या राष्ट्रीय युवक संसद स्पर्धेत सहभाग घेतलेल्या त्यांच्या शाळेच्या संघात त्याने उल्लेखनीय कामगिरी करून तृतीय पारितोषिक मिळवले. ही एक राष्ट्रीय पातळीवरील मोठी कामगिरी होती.

दहावीमध्ये ९२% आणि बारावीत ९०% गुण मिळवून त्याने आपली बौद्धिक गुणवत्ता सिद्ध केली. भावाच्या मार्गदर्शनाने छएएढ, गएए आणि गएए -वींरपलशव या तीनही कठीण परीक्षा यशस्वीपणे पार केल्या आणि त्याच्याकडे एकाचवेळी आय आयटी व एम बी बी एस दोन्हीच्या प्रवेशाचे दालन खुले झाले. मात्र आपल्या वडिलांचे डॉक्टर बनवण्याचे स्वप्न डोळ्या समोर ठेवून









त्याने वैद्यकीय क्षेत्राची वाट निवडली आणि २०१९ साली शासन वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथे एमबीबीएस मध्ये प्रवेश घेतला.

वैद्यकीय शिक्षणा दरम्यान त्याने विविध क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतला अकॅडेमिक उत्कृष्टतेसह विविध कार्यशाळा, सेमिनार, केस स्टडीज, इंटर्नशिपचे अनुभव यामुळे त्याच्या ज्ञान-ात व कौशल्यात लक्षणीय भर पडली. रुग्णसेवा, आपत्कालीन परिस्थिती हाताळणे, क्लिनिकल निर्णयक्षमता अशा अनेक कौशल्यांमध्ये त्याने प्रावीण्य मिळवले. प्राध्यापकां कडून मिळणारे कौतुक हे त्याच्या समर्पणाचे द्योतक होते. १५ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या पदवी समारंभात डीन आणि पीएसएम विभाग प्रमुख यांच्या हस्ते मिळालेले सन्मानचिन्ह हे केवळ पदवीचे नव्हे, तर संपूर्ण प्रवासाच्या यशाचे प्रतीक होते.

या प्रवासा मागे त्याच्या कुटुंबाचे अफाट योगदान आहे. वडील (स्वतः डॉक्टर), आई, भाऊ हृषिकेश यांचा प्रोत्साहन आणि मार्गदर्शन यामुळे तो कायम पुढे जात राहिला. या शिवाय दोन्ही मावश्या, काका, आजी (आई), मोठी आई, मोठे काका-काकी, आत्याबाई, मोठे व लहान मामा-मामी सर्वांनी वेळोवेळी दिलेले मानसिक बळ, प्रेमळ हट्ट, आणि न संपणारा विश्वास यामुळेच ही यशोगाथा शक्य झाली. हा विजय केवळ एकाच व्यक्तीचा नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या प्रेमाचा, पाठिंब्याचा आणि संस्कारांचा आहे.

आज डॉक्टर झाल्या नंतर तो समाजासाठी काहीतरी परत देण्याच्या उद्देशाने काम करण्यास तयार आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचवणे, गरजू रुग्णांना मदत करणे आणि वैद्यकीय क्षेत्रात नवीन काही करून दाखवणे हे त्याचे आगामी उद्दिष्ट आहे. त्याची ही जिद्द, निष्ठा आणि मूल्ये नव्या पिढीसाठी एक प्रेरणा आहेत. त्याचा प्रवास अजूनही संपला नाही तो अजून शिक्षण घेऊ इच्छितो. स्वप्न पाहणे महत्त्वाचे आहे, पण त्यासाठी धाव घेतली तरच ते खरे होते! त्यांच्या यशाचा हा प्रवास हेच शिकवतो. त्यांची ही संघर्षमय यशस्वी यशोगाथा तरुण पिढीला नक्कीच प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही. डॉ. रितीकेश मल्ह-ारी इंगोले यांच्या भावी वैद्यकीय वाटचालीस पत्रकार विश्वास गायकवाड आणि सह परिवारा कडून मंगलमय शुभेच्छा.

# तहकुब झालेली सभा उपविधी प्रमाणे घेण्यावर उपस्थित ९ संचालक आग्रही



**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा: सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित संचालकांमधून सभापती व उपसभापती पदाची निवड करण्यासाठी सोमवारी (दि. २१) रोजी बाजार समिती सभागृहात सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र निवडणुकीच्या निर्धारीत वेळेत फक्त नऊ सदस्य हजर राहिल्याने निवडणूक अधिकारी यांनी अर्धा तास वेळ वाढवूनही इतर संचालक सभागृहात दाखल न झाल्याने अध्यासी अधिकारी जितेंद्र शेळके यांनी निवडणूक तहकुब झाल्याचे जाहीर केले व पुढील सभा वरिष्ठांना अह-वाल सादर करून त्यांच्या मार्गदर्शनाणे पुढील सभा बोलाविण्यात येणार असल्याचे श्री. शेळके यांनी सांगितले. परंतु उपस्थित संचालकांनी याला विरोध करत आपण ज्या उपविधी प्रमाणे निवड सभा तहकुब केली त्याच उपविधीनुसार म्हणजे बाजार समितीच्या सभेत मतदान-ाचा हक्क असणा-या एकुण सदस्यांपैकी निम्म्यापेक्षा एक अधिक सदस्यांची गणप-ुती होईल. जर आवश्यक संख्येइतके सदस्य हजर नसतील तर हजर असलेल्या सदस्यांनी किमान अर्धा तास वाट पाहून तो पावेतोही गणपुती न झाल्यास सभा तहकुब केली पाहिजे. अशी तहकुब झालेली सभा मुळ सभेच्या तिस-या दिवशी व मुळ सभेच्या नोटिशीत नमुद केलेल्या स्थळी व वेळी घेतली पाहिजे व मुळ सभेचे कामकाज पार पाडले पाहिजे. मग गणपुर्ती असो वा नसो, गणपुर्ती खेरीज इतर कोणत्याही कारणाने तहकुब झालेली सभा तहकुब झालेल्या दिवसापासुन तीन दिवसांत घेउन संपवली पाहिजे असा उल्लेख असल्याने उपस्थित त्याच उपविधी प्रमाणे सभा घेण्यावर उपस्थित नऊ संचालकांनी आग्रह धरला आहे. याबाबत अध्यासी अधिकारी जितेंद्र शेळके यांना निवेदन देण्यात आले असून आता श्री शेळके काय निर्णय घे-तात याकडे तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

# सामाजिक क्षेत्रातील अनुकरणीय कार्यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टीलचा रोटरीतर्फे सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**बोरघर/माणगांव (विश्वास गायकवाड) –** स्टील उद्योग क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीला शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५ या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रोटरी इंटरनॅशनल डीस्ट्रीक्ट ३१३१ (रायगड आणि पुणे जिल्हा) ने आयोजित केलेला रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५ समारंभ १८ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथील हयात रीजन्सी येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले. माणगांव तालुक्यातील विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच इतर कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असते तसेच आसपासच्या परीस-ातील स्थानिक लोकांचे जीवनमान उचंविण्यावर आणि सक्षमीकरण करण्यावर नेहमीच भर दिला आहे. कंपनी मार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळांच्या मुलभूत सुविधांचा विकास व गुणवत्ता सुधारणा, शाळांमध्ये सिस्टरहूड रिलेशनशिप प्रकल्प, विज्ञान संच वाटप, शाळांमध्ये ई-लर्निंग चा सेट-अप, संगणक संच वाटप, विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी बस ची व्यवस्था, उच्चशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे विविध उपक्रम राबविले जातात.





पोस्को कंपनी शिक्षण क्षेत्रामध्ये करत असलेल्या उपक्रमांचे निवड समितीने कौतुक केले. हा पुरस्कार केवळ आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीचीच कबुली देत नाही तर एक चांगली सामाजिक चळवळ निर्माण करण्याच्या दिशेने आमचा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो, अशी भावना यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

# येवल्यात जाती- जमातीसाठी १८,ओबीसीसाठी २४ तर ४८ ग्रामपंचायतचे सरपंचपद खुल्या प्रवर्गासाठी निश्चित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी** तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीचे पुढील पाच वर्षासाठीचे सरपंच पदाचे आर-क्षण आज निश्चित करण्यात आले आहे.या आरक्षणाने प्रमुख गावात इच्छुकांचा हिरमोड झालेला दिसतो.तर अंदरसुल,पाटोदा,नगरसुल यास अनेक प्रमुख ग्रामपंचायतीचे आरक्षण खुले झाले आहेआजच्या आरक्षण सोडतीत अनुसूचित जातीसाठी ६,अनुसूचित जमातीसाठी १२,नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी २४ तर सर्वसाधारण ४८ ग्रामपंचायतचे सरपंचपद निश्चित करण्यात आले आहे. थेट सरपंच निवडीमुळे सरपंच पदाच्या आरक्षणाकडे विशेष लक्ष लागून होते.या आरक्षणावर २०३० पर्यंतचे गावोगावचे सरपंचपद निश्चित झाले आहे.येथील तहसील कार्यालयात तहसीलदार आबा महाजन, नायब तहसीलदार पंकज मगर,पुरवठा विभाग प्रमुख बाळासाहेब हावळे,अव्वल कारकून प्रिया सोनार आदींच्या उपस्थितीत आरक्षण सोडत काढण्यात आली. अनुसूचित जाती जमातीचे लोकसंख्येच्या टक्केवारीच्या क्रमाने गावांचा क्रम ला-वून यापूर्वीचे आरक्षण वगळून अनुसूचित जाती व जमातीच्या ग्रामपंचायती निश्चित करण्यात आल्या. अनुसूचित जातीसाठी दुगलगाव,पिंपरी, गुजरखेडे,रेंडाळे,आहेरवाडी,तळवाडे या ग्रामपंचायती तर अनुसूचित जमातीसाठी रहाडी, शिरसगाव लौकी, कोळगाव,डोंगरगाव, अंगुलगाव, मातुलठाण,निमगाव मढ,नांदूर, कुसुर, उंदीरवाडी, देशमाने बुद्रुक,वाघाळे या ग्रामपंचायती आरक्षित झाल्या. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी बाळापूर, गारखेडे, मानोरी बु,लौकी शिरस, गणेशपुर, एरंडगाव बुद्रुक, पिंपळखुटे बुद्रुक, अनकुटे, चिचोंडी खुर्द, धामणगाव, जळगाव नेऊर, कोटमगाव खुर्द,नेऊरगाव, पिंपळगाव लेप, सावरगाव, अनकाई, आडगाव चोथवा, बोकटे, चांदगाव, खैरगव्हाण, महालखेडा पाटोदा, मुरमी, राजापूर, विसापूर या ग्रामपंचायती आरक्षित झाल्या. मागास प्रवर्गासाठी १६ ग्रामपंचायती रोटेशन पद्धतीने ठरविल्या गेल्या हर्षिता किरण पवार या नव वर्षीय मुलीच्या हस्ते चिट्ठ्या काढून आठ ग्रामपंचायती निश्चित करण्यात आल्या.अशा २४ ग्रामपंचायत आरक्षित करण्यात आल्या. याव्यतिरिक्त आडगाव रेपाळ, आडसुरेगाव, आंबेगाव, अंदरसुल,अंगणगाव,बाभुळगाव खुर्द, बल्हेगाव,भारम,भुलेगाव,चिचोंडी बुद्रुक, देवरगाव,देवळाणे,धामोडे,धुळगाव ,एरंडगाव खुर्द,गवंडगाव,जऊळके,कानडी ,कातरणी, खामगाव,खरवंडी,खिर्डीसाठे,कोटमगाव बुद्रुक, कुसमाडी,ममदापुर,मुखेड ,नागडे,नगरसुल, नायगव्हाण,नांदेसर,निळखेडे,पन्हाळसाठे, पांजरवाडी,पारेगाव,पाटोदा,पिंपळगाव जलाल, पुरणगाव,साताळी, सातारे,सायगाव, सोमठाण देश,सुरेगाव रस्ता, ठाणगाव, विखरणी, देवठाण, कोळम बुद्रुक,सत्यगाव, भाटगाव या ग्रामपंचायती सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित झाल्या आहेत. दरम्यान,या आरक्षणात आता ४५ ग्रामपंचायती महिलांसाठी आरक्षित केल्या जाणार आहे. त्यासाठीची सोडत गुरुवारी (ता. २४) उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे यांच्या दालनात काढली जाणार आहे अशी माहिती नायब तहसीलदार पंकज मगर यांनी दिली.

# रावजी वक्ते यांचे निधन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

जेऊर कुंभारी वार्ताहर – कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी गावातील प्रगतशील शेतकरी रावजी नारायण वक्ते यांचे वय वर्ष ८१ अल्पश अजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले, एक मुलगी ,भाऊ नातु नातवंड असा परिवार आहे ते किसन वक्ते आनंदराव वक्ते महर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते यांचे बंधु तसेच रामभाऊ वक्ते यांचे वडील होत.